लोकशाही वार्ता
प्रतिबिंब
रविवार, दि. ३० जून २०२४




# एआय : तारक की मारक?

शिल्पा ठाकरे

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे केवळ दोन शब्दच नसून, अत्यंत वेगाने बदलणाऱ्या जगातील विलक्षण, असे हे परिवर्तन आहे. गूगल वा चॅट जीपीटीला कोणताही प्रश्न विचारा, उत्तर क्षणार्धात समोर येणार! गूगलवर मिळालेल्या आयत्या माहितीमुळे मनुष्य बुद्धिमान होणार का? त्याचा बुध्यांक वाढेल का? आपल्याला आयत्या माहितीमधून समाधान मिळणार का? आपण काहीतरी नवे शिकलो, हे आत्मसुख मिळेल का? असे प्रश्न सध्या निर्माण झाले आहेत. केरळ राज्यातील एका शाळेत सध्या एआय टीचर क्लास घेत आहे! टेस्ला ही कार बनवणाऱ्या जगातील आघाडीची कंपनीने एआयचा वापर करून ड्रायव्हरलेस कार बनविली आहे. भविष्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता मनुष्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनणार आहे. त्यामुळे शालेय जीवनातच एआयबद्दल माहिती होणे आता गरजेचे आहे. शालेय अभ्यासक्रमात एआय हा मुख्य विषय असायला हवा. एआयचा चांगला वापर केला तर ते तारक आणि वाईट वापर केला, तर मारकही ठरू शकते. दीर्घकाळ समाधान मिळवायचे असेल, तर ज्ञान कृत्रिम नको, ते शाश्वत हवे!**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे केवळ दोन शब्दच नसून, अत्यंत वेगाने बदलणाऱ्या जगातील हे विलक्षण, असे हे परिवर्तन आहे. वर्तमानाला तंत्रज्ञानाचे युग म्हटले जाते. सध्याच्या काळात रोबोची निर्मिती झाली आहे. हे रोबो मानवाप्रमाणे बोलतात, मानवाप्रमाणे कार्य करतात, तसेच ज्याप्रमाणे मनुष्य स्वतःच्या बुद्धिने कार्य करतो, तसेच रोबोही स्वतःच्या बुद्धिने कार्य करतात, त्यालाच एआयचा आविष्कार म्हटले जाते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्ता होय. कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुद्धिमान वर्तनास कृत्रिम बुद्धिमत्ता, असे म्हणतात. ही कृत्रिम वस्तू साधारणतः संगणकच असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय विज्ञानकथांमध्ये जास्त आढळत असला तरी, संगणक शास्त्रातील ही एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण (मशिन लर्निंग), त्यांचे वर्तन व परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. या शाखेतील संशोधन मुख्यतः स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असलेली बुद्धिमान वर्तणूक करू शकतील, अशा यंत्राशी संबंधित आहे.

नियोजन, संयोजन, निदानविषयक प्रश्नांची उत्तरे शोधण्याची क्षमता तसेच हस्ताक्षर, आवाज, चेहरा ओळखण्याची क्षमता याप्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन जीवनातील समस्या सोडविणारी विज्ञानशाखा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता असणाऱ्या प्रणाली या अर्थशास्त्र, आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, संरक्षण, कॉम्प्युटर गेम्स् आणि संगणक प्रणाली यामध्ये वापरल्या जातात.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा शोध जॉन मककॉर्थी यांनी १९५६साली लावला. कालांतराने या तंत्रज्ञानाला मागणी वाढू लागली. आज सर्व क्षेत्रात एआयचा वापर केला जात आहे. भविष्यामध्ये, तर कृत्रिम बुद्धिमत्ता मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनणार आहे.

गूगल वा चॅट जीपीटीला कोणताही प्रश्न विचारा, उत्तर क्षणार्धात समोर येणार. गूगलवर मिळालेल्या आयत्या माहितीमुळे मनुष्य बुद्धिमान होणार का? त्याचा बुध्यांक वाढेल का? आपल्याला आयत्या माहितीमधून समाधान मिळणार का? आपण काहीतरी नवे शिकलो, हे आत्मसुख मिळेल का? असे प्रश्न सध्या निर्माण झाले आहेत.

एआयचा वापर रिटेल, शॉपिंग, फॅशन, सिक्युरिटी सर्वेलन्स, स्पोर्ट्स ॲनालिसिस, उत्पादन प्रणाली अशा सर्वच क्षेत्रात होऊ लागला आहे. बँकेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग व्यवहार सांभाळण्यासाठी , शेयर्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी तसेच मालमत्ता सांभाळण्यासाठी केला जातो.


रुग्णालयामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता असलेल्या प्रणालीमुळे बिछान्यांचे वेळापत्रक तयार करणे, कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा बदलत्या ठेवणे, वैद्यकीय माहिती देणे यासारखी कामे होत आहेत. शिक्षणक्षेत्रातसुध्दा एआयने प्रवेश केला आहे. केरळ राज्यातील एका शाळेत एआय टीचर क्लास घेत आहे! टेस्ला ही कार बनवणाऱ्या जगातील आघाडीची कंपनीने एआयचा वापर करून ड्रायव्हरलेस कार बनविली आहे. गूगल ॲपमध्येही एआय वापरले जाते, ज्यामुळे प्रवास करणे आता सगळ्यांसाठी कमालीचे सोयीचे झाले आहे. स्मार्टफोन्स, ऑनलाईन बँकिंग व्यवहार, ऑनलाईन डेटा फाईल्सची सुरक्षा या डिजिटल गोष्टींमध्ये एआयचा खूप फायदा होऊ शकतो. डेटा चोरी होणे, ऑनलाईन लिंक्स फ्रॉड इत्यादी गोष्टीवर नियंत्रण या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करता येते. शालेय जीवनातच एआयबद्दल माहिती होणे गरजेचे आहे. शालेय अभ्यासक्रमात एआय हा मुख्य विषय असायला हवा. हा विषय मुलांना केवळ सर्जनशीलच बनवीत नाही, तर मुलांची कल्पनाशक्ती, तार्किक विचार,

(पान २वर)

## दिनविशेष



# स्वामी विवेकानंद



स्वामी विवेकानंद (१२ जानेवारी १८६३ - ४ जुलै १९०२) हे भारतीय तत्वज्ञ होते. तरुणपणीच ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य झाले आणि रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहोचवण्यासाठी त्यांनी रामकृष्ण मिशन सुरू केले. उत्तर कोलकात्यातील सिमलापल्ली येथे १२ जानेवारी १८६३ रोजी विवेकानंदांचा जन्म झाला. त्यांचे नाव नरेंद्र ठेवण्यात आले. वडील विश्वनाथ दत्त हे कोलकाता उच्च न्यायालयात ॲटर्नी होते. आई भुवनेश्वरी देवी या धार्मिक वृत्तीच्या होत्या.

नरेंद्रनाथाच्या विचारसरणीला आकार देण्यात त्यांच्या पालकांचा वाटा होता. नरेंद्रनाथाला दर्शनशास्त्रे, इतिहास, समाजशास्त्रे, कला, साहित्य इत्यादी अनेक विषयांत रूची आणि गती होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, गीता आदी धार्मिक साहित्यात त्याने विशेष आवड दाखवली. जुनाट अंधश्रद्धा आणि जात्याधारित भेदभाव यांच्या वैधतेसंबंधी त्यांनी लहानपणातच प्रश्न उपस्थित केले होते. आधार नसलेली कुठलीही गोष्ट स्वीकारण्यास नकार दिला होता. विवेकानंद हे मित्र परिवारात प्रिय होते, त्यांचे मित्र त्यांना 'बिले' या नावाने हाक मारत तर त्यांचे गुरू नोरेन या शब्दाने. नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. नंतर त्यांनी १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला आणि ते १८७९मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले.

काही दिवस या संस्थेत राहिल्यानंतर पुढे त्यांनी जनरल असेम्ब्लीज इन्स्टिट्यूशनमध्ये प्रवेश घेतला. येथे त्यांनी तर्कशास्त्र, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, आणि युरोपचा इतिहास यांचा अभ्यास केला. १८८१ साली ते फाईन आर्टची आणि १८८४ मध्ये बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. हर्बर्ट स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाने ते प्रभावित झाले होते. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासोबत त्यांनी प्राचीन संस्कृत आणि बंगाली ग्रंथांचाही गाढ अभ्यास केला होता. १८८१-८४ मध्ये ते जेथे शिकले त्या स्कॉटिश चर्च कॉलेजचे प्राचार्य डॉ. विल्यम हेस्टी यांनी म्हटले आहे, ''नरेंद्र खरोखरच बुद्धिमान आहे. मी खुप फिरलो, जग पाहिले परंतु, त्याच्यासारखी प्रतिभा आणि बुद्धिसामर्थ्य असलेला मुलगा अगदी जर्मन विद्यापीठातल्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांमध्येही मला बघायला मिळाला नाही.'' १८८१ च्या नोव्हेंबर महिन्यात श्री रामकृष्ण पहिल्यांदाच नरेंद्रला भेटले आणि त्याचे गायन ऐकून संतुष्ट झाले. त्यांनी त्याला दक्षिणेश्वर येथे येण्याचे आमंत्रण दिले. श्री रामकृष्णांनी नरेंद्रनाथांना संन्यासदीक्षा देऊन त्यांचे नामकरण 'स्वामी विवेकानंद' असे केले. वेदांत आणि योग या विषयावर 'स्वामी विवेकानंद यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इतर काही युरोपीय देशांमध्ये जाहीर तसेच खासगी व्याख्याने दिली. ४ जुलै १९०२ रोजी त्यांनी कोलकात्याजवळील बेलूर मठात समाधी घेतली. ■

# वसंतराव नाईक

महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री व कृषितज्ज्ञ असलेले वसंतराव फुलसिंग नाईक (१ जुलै १९१३ - १८ ऑगस्ट १९७९) यांचा जन्म विदर्भातील गहुली (जिल्हा यवतमाळ) येथे सधन शेतकरी कुटुंबात झाला. नाईकांचे मूळ आडनाव राठोड; पण गहुली हे खेडे चतुरसिंग राठोड याने वसविले. त्याने जमीनजुमला जमा करून आपल्या समाजाला स्थिर जीवन प्राप्त करून दिले. साहजिकच तो समाजाचा नाईक म्हणजे पुढारी झाला. त्यावरून पुढे नाईक हे आडनाव रूढ झाले.



चतुरसिंगाचा फुलसिंग हा मुलगा पुढे या समाजाचा नाईक झाला. त्याच्या होनूबाई या पत्नीला दोन मुलगे झाले. राजूसिंग व हाजूसिंग. हाजूसिंग छोटे बाबा या नावाने प्रसिद्ध होते. पुढे त्यांना वसंतराव हे नाव पडले. वसंतरावांचे प्राथमिक शिक्षण विविध खेड्यांत झाले. पुढे त्यांनी विठोली व अमरावती येथे माध्यमिक शिक्षण घेऊन नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी. ए. ही पदवी घेतली (१९३८) व नंतर एलएलबी ही पदवी मिळविली (१९४०). त्यांच्यावर महात्मा जोतिबा फुले व डेल कार्नेगी या दोघांच्या विचारांची छाप पडली. तसेच महाविद्यालयात असताना त्यांचा स्नेह नागपूरमधील घाटे या प्रसिद्ध ब्राह्मण कुटुंबाशी जडला. या स्नेहाची परिणती वसंतराव व वत्सलाबाई यांच्या आंतरजातीय प्रेमविवाहात झाली (१९४१). या विवाहामुळे विदर्भात खळबळ उडाली व उभयतांना काही वर्षे आपापल्या घरांपासून अलिप्त राहणे अपरिहार्य झाले; पण वसंतरावांनी पूर्ण विचारांती हे लग्न केले होते. त्यांची वकिलीही ठीक चालली होती. वत्सलाबाई बी. ए. होत्या आणि वसंतरावांच्या बरोबरीने समाजकार्यात सहभागी असत. त्यांना निरंजन व अविनाश ही दोन मुलं झाली.

१९४६ मध्ये वसंतराव यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मध्य प्रदेश राज्याच्या मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली. ते पुसदच्या नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. पहिल्या निवडणुकीत ते मध्य प्रदेश राज्यात महसूल खात्याचे उपमंत्री झाले. १९५६ मध्ये राज्यपुनर्रचनेनंतर विदर्भ व मराठवाडा हे प्रदेश मुंबई द्विभाषिक राज्यात समाविष्ट झाल्यानंतर वसंतराव हे यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात कृषिमंत्री झाले. पुढे १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर ते प्रथम महसूल मंत्री होते. १९६२ च्या निवडणुकीनंतरही कन्नमवारांच्या मंत्रिमंडळात ते महसूल मंत्री होते; पण कन्नमवारांच्या मृत्यूनंतर ते बहुमताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १८ ऑगस्ट १९७९ रोजी त्यांचे निधन झाले. ■

# व्यंकटेश माडगूळकर

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर (६ जुलै १९२७ - २८ ऑगस्ट २००१) हे मराठी लेखक आणि चित्रकार होते. त्यांनी कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णनांसह चित्रपटांसाठी पटकथाही लिहिल्या. त्यांना शिकारीचा छंद होता. त्यांनी काही पुस्तके त्यांच्या जंगल भ्रमंतीच्या अनुभवांवर लिहिली आहेत.



व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळचा. औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. तथापि त्यांनी स्वःप्रयत्नाने व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्य साहित्याचेही वाचन केले. मराठी कवी, गीतकार ग. दि. माडगूळकर यांचे ते धाकटे बंधू होत. व्यंकटेश माडगूळकर हे आकाशवाणीवर दीर्घकाळ (१९५५-८५) नोकरीत होते. आरंभी काही काळ पत्रकारिता केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी 'माणदेशी माणसे' (१९४९) हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी सहित्याला अनोखे होते. स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी (१९५१), हस्ताचा पाऊस (१९५३), सीताराम एकनाथ (१९५१), काळी आई (१९५४), जांभळीचे दिवस (१९५७) यासारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जागतिक भाषांत झालेले आहेत. ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. बनगरवाडी (१९५५), वावटळ (१९६४), पुढचं पाऊल (१९५०), कोवळे दिवस (१९७९), करुणाष्टक (१९८२), आणि सत्तांर (१९८२), या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात ते सहभागी झाले होते. 'कोवळे दिवस' या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव आहेत. एका अनुसूचित जातीच्या कलावंताच्या जीवनावरील या कादंबरीत त्याच्यावरील अन्यायाबद्दलची त्याची चीड आणि पुढचे पाऊल टाकून प्रगतीचा मार्ग शोधण्याची वंचित मनाची धडपड दाखाविली आहे. त्यांनी नाटकेही लिहिली, तू वेडा कुंभार, सती, पति गेले गं काठेवाडी ही त्यातील काही विशेष उल्लेखनीय होत. 'कुणाचा कुणाला मेळ न्हाई' आणि 'बिनबियांचे झाड' ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. २८ ऑगस्ट २००१ रोजी त्यांचे निधन झाले. ■

# राजकुमार



राजकुमार हे एक प्रसिद्ध अभिनेते होते. ८ ऑक्टोबर १९२६ला बलुचिस्तानात जन्म झालेले कुलभूषण पंडित आपले पदवी शिक्षण पूर्ण करून मुंबईच्या माहिम पोलीस स्टेशनमध्ये इन्स्पेक्टर म्हणून काम करु लागले. एकेदिवशी रात्री गस्त घालत असताना एका शिपायाने त्यांना सांगितले की, तुमचे व्यक्तिमत्व एका हिरोपेक्षा कमी नाही. तुम्ही जर चित्रपटातून हिरो म्हणून काम कराल, तर प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य कराल. मग काय कुलभूषण यांनी ही गोष्ट मनावर घेतली.

पोलिस स्टेशनला नेहमीच चित्रपटसृष्टीशी संबंधित लोकांचे येणे-जाणे सुरू असायचे. असेच एकदा बलदेव दुबे काही महत्त्वाच्या कामाने पोलीस स्टेशनला आले आणि त्यांना कुलभूषण यांच्या बोलण्याची शैली फारच आवडली. त्यांनी लगेचच त्यांच्या शाहीबाजार या चित्रपटात काम करण्यासाठी कुलभूषण यांना विचारले. इन्स्पेक्टरच्या नोकरीचा राजीनामा देऊन कुलभूषण यांनी चित्रपटसृष्टीत जाण्याचा निर्णय घेतला. कुलभूषण उर्फ राजकुमार यांनी रंगिली या चित्रपटात छोटी भूमिका स्वीकारली. महबूब खान यांच्या मदर इंडिया या चित्रपटात राजकुमार गावातील एका शेतकऱ्याच्या भूमिकेत दिसले.

पूर्ण चित्रपट नरगिस यांना केंद्रित ठेवून केलेला होता, पण आपल्या लहानशा भूमिकेतील दमदार अभिनयाने राजकुमार यांना केवळ हिंदी चित्रपटसृष्टीतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिनेता म्हणून ख्याती मिळवून दिली. या अभिनेत्याचे ३ जुलै १९९६ रोजी निधन झाले. ■

# एआय : तारक की मारक?

(पान १वरून)

आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढवतो. झपाट्याने बदलणाऱ्या जगाची आपल्या मुलांना लहानपणापासूनच ओळख करून देणे महत्त्वाचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे बघता, कृत्रिम बुद्धिमत्तेचा चांगला वापर जर केला, तर तो फायदेशीर ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे येत्या १०-१५ वर्षांत बदल घडणार असून, तरुण पिढी यासाठी तयार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता तारक की मारक? असे विचारले तर, ती तारकही आहे आणि मारकसुध्दा आहे. याचा वापर जितका चांगला, तितकाच वाईटही आहे. हे सारे माणसावर अवलंबून आहे. चॅट जीपीटीच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही बाजू आहेत. अनेक लोक एआयला नावे ठेवतात, कारण यामुळे नोकऱ्यांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळेच योग्य रीतीने भान ठेवून वापर केला पाहिजे. एआय हे १० सेकंदात चित्रकार राजा रवी वर्मा यांच्यापेक्षा १०० पटीने चांगले चित्र काढते! नाण्याला दोन बाजू असतात, तशाच दोन बाजू एआयलासुध्दा आहे. ते आपल्या चांगल्या आणि वाईट वापरावर पूर्णपणे अवलंबून आहे. त्यामुळेच एआयचा चांगला वापर केला, तर ते तारक आणि वाईट वापर केला, तर मारकही ठरू शकते.

वडिलोपार्जित जमीन संपत्ती मिळाली म्हणून, घरी बसून खाण्याने माणूस आळशी बनतो, आरोग्यसुध्दा गमावतो, शारिरीक व्याधी जडतात, रोगांना निमंत्रण मिळते. कृत्रिमरीत्या तयार केलेल्या फुलांना सुगंध येतो का? याचा विचार होण्याची गरज आहे.

जर आपण शिक्षणाच्या फायद्यासाठी त्याचा अधिकाधिक वापर करू शकलो, तर तो एक आशीर्वाद असेल, परंतु जर आपण ते आपल्यावरच स्वार होऊ दिले किंवा आपण त्याच्याबरोबर वाहवत गेलो, तर तो एक शापही ठरू शकतो!

■ शिक्षिका,
मीनाताई माध्यमिक विद्यालय,
नवखला, ता. नागभीड, जि. चंद्रपूर

# पुन्हा एकदा संपत्ती आणि वारसा कर

**चौफेर**



जगात आणि भारतात आर्थिक विषमता होती आणि आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. ही विषमता नष्ट व्हावी, यासाठी साम्यवाद-समाजवाद तसेच भांडवलशाही हे दोन उपाय सांगण्यात आले. साम्यवादी व्यवस्था जगभर अपयशी ठरली, परंतु भांडवलशाहीमध्ये सर्वजण सुखी होत नाहीत आणि समाजातील दोन वर्गांमध्ये प्रचंड विषमता निर्माण होते, याचा अनुभव आला. भांडवलशाहीमध्येही क्रोनी कॅपिटलिझम किंवा साट्यालोट्याची भांडवलशाही जनतेने अनुभवली आहे. आपल्या व्यवस्थेत विशिष्ट उद्योगपतींचेच हित पाहिले जाते, अशी टीका ब्राझील, रशिया आणि अगदी भारतातदेखील केली जाते. आता भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेवर उपाय म्हणून सरकारने दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक संपत्ती असणाऱ्या अतिश्रीमंतांवर दोन टक्के कर लावावा, अशी शिफारस नामवंत फ्रेंच अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांनी आपल्या शोधनिबंधातून केली आहे. राजीव गांधी यांचे विश्वासू सहकारी सॅम पित्रोदा यांनी नुकताच वारसा कराचा पुरस्कार केला आणि त्यावरून देशात वाद निर्माण झाला होता. परंतु पिकेटी यांनीही भारतात ३३ टक्के दराने वारसा कर आकारावा, अशी सूचना केली आहे.

आर्थिक विषमतेत वाढ झाली आहे, असा निष्कर्ष वर्ल्ड इक्वॅलिटी लॅबशी संलग्न असलेल्या अर्थतज्ज्ञांनी २०२४मध्ये काढला होता. त्यानुसार, देशात २०००च्या सुरुवातीपासून असमानता वाढली. त्यावेळी देशातील एक टक्का श्रीमंतांचा २२ टक्के




**अमेरिकेमध्ये इस्टेट टॅक्स आणि आणि वारसा कर, असे दोन वेगवेगळे कर अस्तित्वात आहेत. यापैकी इस्टेट टॅक्स हा संपत्तीवर (ती वाटली जाण्यापूर्वी) आकारला जातो, तर वारसा कर हा वारसदारांवर लावला जातो. अमेरिकेच्या आयोवा, केंटकी, मेरिलँड, नेब्रास्का, न्यू जर्सी आणि पेनसिल्व्हेनिया या राज्यांमध्ये वारसा कर आकारला जातो. संपत्ती देणाऱ्याशी असलेले वारसदाराचे नाते आणि संपत्तीचे मूल्य यावर या करआकारणीचे गुणोत्तर ठरते.**

संपत्तीवर अधिकार होता. परंतु २०२२-२३मध्ये हे प्रमाण ४० टक्क्यांवर जाऊन पोहोचले. म्हणजे जवळपास दुप्पट झाले. देशाच्या सर्वाधिक संपत्तीवर एका टक्क्यांची मालकी असण्याच्या प्रकारात दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि अमेरिकेलाही भारताने मागे टाकले आहे. म्हणूनच पिकेटींनी भारतात दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक असलेली निव्वळ संपत्ती ही वार्षिक दोन टक्के कर आकारणीस पात्र ठरावी. याचबरोबर दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्तीवर ३३ टक्के दराने वारसा कराची आकारणी केली जावी, असे सुचवले आहे. त्यामुळे करमहसूल वाढून सकल देशांतर्गत उत्पादनात म्हणजेच जीडीपीमध्ये २.७३ टक्के योगदान दिले जाईल, असे सांगत या तरतुदी नव्याने लागू केल्या, तरी ९९ टक्के प्रौढ लोकसंख्येला कोणतीही झळ बसणार नाही, असे आपल्या शोधनिबंधात म्हटले आहे. या प्रकारे करमहसूल वाढल्यास सरकारला शिक्षणावरचा खर्च दुपटीने वाढवणे शक्य होईल. केंद्राच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार, शिक्षणावर जीडीपीच्या तुलनेत सहा टक्के खर्च करणे आवश्यक आहे, प्रत्यक्षात तो तीन टक्केदेखील नाही. सॅम पित्रोदा यांनी वारसा कराचा मुद्दा मांडला. देशातल्या श्रीमंत-गरीब यांच्यामधल्या संपत्तीतल्या तफावतीचा, विषमतेचा मुद्दा काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यात आहे. धोरणांमध्ये योग्य बदल करीत देशातली संपत्ती आणि उत्पन्नातली वाढती विषमता कमी करू, असे काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले होते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीही प्रचारसभा आणि भाषणांमध्ये वेळोवेळी याचा पुनरुच्चार केला. पित्रोदा यांच्या मुलाखतीनंतर वारसा कराचा मुद्दा चर्चेत आला. वारसा कर हा एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या वा तिच्या संपत्तीवर आणि पर्यायाने वारसदारांवर आकारला जातो. पित्रोदा यांनी आपल्या मुलाखतीत अमेरिकेतल्या या कराचा दाखला दिला; पण अमेरिकेत सरसकट सगळीकडे हा कर लागू करण्यात आलेला नाही. अमेरिकेतल्या सहा राज्यांमध्ये हा कर आकारण्यात येतो आणि प्रत्येक राज्यात आकारला जाणारा कर वेगवेगळा आहे.

अमेरिकेमध्ये इस्टेट टॅक्स आणि आणि वारसा कर असे दोन वेगवेगळे कर अस्तित्वात आहेत. यापैकी इस्टेट टॅक्स हा संपत्तीवर (ती वाटली जाण्यापूर्वी) आकारला जातो, तर वारसा कर हा वारसदारांवर लावला जातो. अमेरिकेच्या आयोवा, केंटकी, मेरिलँड, नेब्रास्का, न्यू जर्सी आणि पेनसिल्व्हेनिया या राज्यांमध्ये वारसा कर आकारला जातो. संपत्ती देणाऱ्याशी असलेले वारसदाराचे नाते आणि संपत्तीचे मूल्य यावर या करआकारणीचे गुणोत्तर ठरते.

ब्रिटनमध्येही वारसा कर अस्तित्त्वात आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर असलेल्या संपत्तीच्या मूल्यातून कर्जाची रक्कम वजा केली जाते आणि कायद्यानुसार जाहीर करण्यात आलेल्या करमुक्त संपत्ती मर्यादेपेक्षा (सव्वा तीन लाख पौंड) अधिकच्या संपत्तीवर हा ४० टक्के वारसा कर आकारला जातो. जपान, दक्षिण कोरिया, फ्रान्स या देशांमध्येही असा वारसा कर आकारला जातो. भारतात एके काळी अशा प्रकारचा वारसा कर अस्तित्वात होता. त्याला इस्टेट ड्युटी म्हटले जात असे.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर संपत्तीचे हस्तांतरण होताना हा कर आकारला जात असे. १९८५मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ही इस्टेट ड्युटी रद्द केली. संपत्ती कर आणि इस्टेट ड्युटी हे दोन्ही कर एकाच संपत्तीवर आकारले जातात. हा कर गोळा करण्यासाठी मोठा प्रशासकीय खर्च लागतो. संपत्तीचे विषम वितरण टाळण्यासाठी आणि राज्यांना आपल्या विकासयोजनांसाठी निधी देण्यासाठी हा कर आकारणे सुरू करण्यात आले होते; पण हे हेतू साध्य होत नसल्याचे तत्कालीन अर्थमंत्री व्ही. पी. सिंह यांनी म्हटले होते.

■ **हेमंत देसाई**

**मंथन**




# वृद्धांचे एकाकी जीवन

मागील काही दशकांपासून आपल्या देशातील अनेक मुले परदेशी स्थायिक झाल्यामुळे विशेषकरून अनेक ज्येष्ठ नागरिक आपले एकाकी जीवन जगत आहेत . जी आपल्या समाजाला चिंता करणारी बाब आहे. परंतु अनेक ठिकाणी मुलांबरोबर राहणाऱ्यांनाही अनेकदा तोंड दाबून बुक्क्यांचा मार अनेक ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागतो. ही परिस्थितीदेखील तेवढीच दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. या संदर्भात दिल्ली उच्च न्यायालयाने आई-वडिलांच्या मालकीच्या घरात मुले केवळ त्यांच्या दयेवरच राहू शकतात. त्यांना पालकांच्या घरात राहण्याचा कायदेशीर अधिकार नाही, असा निकाल दिला होता. ही नक्कीच योग्य बाब आहे. आपणही कालांतराने ज्येष्ठ नागरिक होणार आहोत आणि आता आपण करीत असलेला छळ पाहणारी आपली मुलेही आपल्याला अशाच प्रकारे वागवू शकतात, याचे भान सुटलेली अनेक मुले आपल्याला आजूबाजूला दिसतात. आई-वडिलांना कस्पटासमान लेखणारी मुले आणि सुना यांचे प्रमाण आज प्रचंड म्हणावे एवढे वाढलेले आहे. हे आई-वडील अनेकदा या मुलांवर अवलंबून नसतात. अनेकदा उच्चपदस्थ अधिकारी म्हणून ते निवृत्त झालेले असतात. अनेकदा प्रसिद्ध व्यक्तीही यातून सुटत नाहीत, कारण अखेर त्यावेळी त्या ज्येष्ठ बनलेल्या असतात. म्हणूनच मुलाने किंवा मुलीनेही आपल्याला उतरत्या वयात आधार दिला, तर ते त्यांचे कर्तव्य आहे, असे वाटण्याऐवजी अनेक आई-वडील त्यांना वचकून राहतात.

जोपर्यंत मुलं बघताहेत, तोपर्यंत ठीक आहे, उद्या आपली मुलंही इतरांसारखी वागू लागली तर? असा विचार बहुतेक ज्येष्ठ नागरिकांना छळत राहतो. त्यामुळे मुले जवळ नसतील, तरीही ती परदेशी आहेत म्हणून एकाकीपणा आणि जवळ असली, तर त्यांच्या छळाविषयी आपल्याला बोलणे शक्य नाही, या भीतीपोटी आलेला एकाकीपणा! यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अनेक ठिकाणी असह्य झाल्याचे दिसून येते. दिवसेंदिवस वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढत चालले आहे आणि त्यांच्या समस्याही भीषण बनत चालल्या आहेत. ज्येष्ठांचे दागिने पळवणारे, मंगळसूत्रे हिसकावणारे चोरटे जेवढे त्यांना त्रासदायक ठरत आहेत त्याहूनही काकणभर अधिकच

**मुलांना आपली जबाबदारी घ्यायची नसेल तर हरकत नाही; पण त्यांची जबाबदारी आपण किती काळ घ्यायची आणि ही जबाबदारी स्वीकारूनही जणू काही त्याबद्दल चोराच्या उलट्या बोंबा म्हणून या जबाबदारीच्या व्याजापोटी त्यांच्याकडून होणारा छळ का सहन करायचा? हा प्रश्नही स्वतःला विचारला पाहिजे.**




प्रमाणात पोटची मुले त्यांना त्रासदायक ठरत असल्याच्या अनेक घटना हे भीषण सामाजिक वास्तव सातत्याने अधोरेखित करीत आहेत.

आता आई-वडिलांनी खंबीर बनले पाहिजे. समाज काय म्हणेल, लोक काय म्हणतील याचा बाऊ न करता आपले काय होतेय, याचा विचार केला पाहिजे. आयुष्यभर कुटुंबासाठी राबविल्यानंतर आपल्याच हक्काच्या घरात आपण समाधानाने राहू शकत नसू, तर मुले मोठी झाली की, स्वतंत्र व्यक्ती आहेत याचा विचार त्यांनी केलाच पाहिजे.

मुलांना आपली जबाबदारी घ्यायची नसेल तर हरकत नाही; पण त्यांची जबाबदारी आपण किती काळ घ्यायची आणि ही जबाबदारी स्वीकारूनही जणू काही त्याबद्दल चोराच्या उलट्या बोंबा म्हणून या जबाबदारीच्या व्याजापोटी त्यांच्याकडून होणारा छळ का सहन करायचा? हा प्रश्नही स्वतःला विचारला पाहिजे. त्यासाठी सर्वांनीच जागरूकतेने व्यवहार केले पाहिजे. मुलांना सगळी माहिती सांगण्यापेक्षा कागदपत्रांच्या रूपात त्यांना आपल्या मृत्यूनंतर ती कळेल अशी व्यवस्था करणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. मृत्युपत्राविषयी मुलांना माहिती न देणे याचाही यात समावेश होतो. शिवाय संपत्ती आणि दागिन्यांचे वाटप करायचे असेल, तेव्हा सगळ्या मुलांच्या उपस्थितीतच ते करायला पाहिजे. शक्यतो आपल्या हयातीनंतर ते त्यांना मिळेल अशी व्यवस्था करणे महत्त्वाचे ठरते. त्यांनी दिलेल्या कागदपत्रांवर डोळे झाकून सही न करता कागदपत्रे पूर्ण वाचून आणि कायदेशीर कागदपत्रे असतील, तर वकिलाचा सल्ला घेऊनच सही करावी. या संदर्भात अधिक जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे.

■ **प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
मो. ९४२०५६६४०४

## लघुकथा



# लोखंड्या

**तो पक्का चोर होता. पण चोरी आपल्या एरियात कधीही करायचा नाही. रिस्पेक्टफुल राहायचा. गावातले सारे त्याला 'लोखंड्या' म्हणायचे! पंधरा-सोळाव्या वर्षांपासून चोरी केल्यामुळे पोलिसांनी पकडून त्याला कित्येकदा मारमार मारले होते, पण तो लोखंडासारखा मजबूत आणि निगरगट्ट झाला होता. पोलिसांनी मारून-मारून त्याचे समोरचे दात पाडून टाकले होते. इतका मार खायचा! त्याचं नाव एरियामध्ये 'लोखंड्या' असंच पडलं होतं.**



लोखंड्या आपल्या गल्लीमध्ये कधीच चोरी करायचा नाही. तो कुणाच्या धाकदपटशाला ऐकणारा नव्हता. तो पक्का चोर होता. पण चोरी आपल्या एरियात काही करायची नाही. रिस्पेक्टफुल राहायचा. गावातले सारे त्याला लोखंड्या म्हणायचे! पंधरा-सोळाव्या वर्षांपासून चोरी केल्यामुळे पोलिसांनी पकडून त्याला कित्येकदा मारमार मारले होते. पण तो लोखंडासारखा मजबूत आणि निगरगट्ट झाला होता. पोलिसांनी मारून मारून त्याचे समोरचे दात पाडून टाकले होते. इतका तो मार खायचा! त्याचं नाव एरियामध्ये लोखंड्या असंच पडलं होतं.

आजीच्या घराला लागूनच त्याचं घर होतं. आजीच्या घराच्या जाळीच्या खिडकीतून लोखंड्याचं घर आरपार दिसायचं. पण उलट्या बाजूने बघितल्यावर मात्र काहीही दिसायचं नाही. फक्त कोणीतरी उभा आहे वाटायचं. त्यामुळे लोखंड्याच्या घरी काय चाललं आहे? हे सगळं दिसत होतं. पण आजी खिडकीत उभे राहू द्यायची नाही. 'काय त्या चोराचं घर बघायचं?' म्हणून ती रागवायची!

ज्या दिवशी त्या अंगणात गहू सुकायला टाकले. त्यादिवशी समजायचं याने रात्री कुणाच्यातरी गव्हावर हात मारला, जेव्हा केव्हा तुरी पसरलेल्या दिसल्या, तर समजायचं लोखंड्यानं रात्री कुठेतरी डाळ शिजवली! आजूबाजूचे शेजारी त्याच्याकडून हा माल विकत घ्यायचे. कमी किमतीत हा माल मिळायचा. लोखंड्याही तो साठवून ठेवणे परवडायचं नाही! कंट्रोलचे गहू घेण्यापेक्षा किंवा ते दुसरीकडे विकून असक्याकडून हे धान्य घ्यायला शेजाऱ्यांनाही परवडायचं! तो घराला कितीदा पेंट करायचा माहिती नाही. कुठून बिचारा एवढे पेंट आणायचा ठाऊक नाही. दर महिन्याला त्याच्या घराला नवीन रंग दिलेला असायचा. घर एवढं टापटीप असायचं, की कोणीही हे चोराचं घर आहे असं म्हणणार नाही. येऊन-जाऊन तो घरालासारखा पेंट करायचा. घर अगदी चकचक दिसायचं. महिना-दोन महिन्यात घराचा रंग बदललेला असायचा.

त्याच्या घराच्या आतील जिना वेडावाकडा होता. जेणेकरून पोलिस आल्यानंतर त्यांना चकमा देऊन त्याला पळता यावं! त्याने तो स्पेशली बनवून घेतला होता. एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत पोलिसांनी सर्व मोहल्यामध्ये वरात काढून चांगला फोडून काढला होता! गावात काहीही झालं तरी पहिला टारगेट लोखंड्याच असायचा! मात्र तोही इतका अट्टल गुन्हेगार होता की, सगळ्या वस्तू तो जागच्या जागी रफादफा करायचा. ह्या कानाची त्या कानाला खबर नाही लागू द्यायचा. मात्र एरियातील लोकांना माहिती होतं. ते बऱ्याचवेळा दहशतीखाली राहायचे. कारण हा शेतातीलही उभं पीक रात्री-बेरात्री जाऊन कापून आणायचा. त्याच्या भीतीने काहीही कारण नसताना लोक शेतावर जागलीसाठी जायचे! रात्री त्याची सायकल वाजली की, आजी म्हणायची," निघाला ड्युटीवर!"

रात्रभर त्याच्या घरामध्ये खुळ, खुळ असा आवाज यायचा. रात्री बारा-एक वाजता आणलेला माल पहाटेपर्यंत तोडताड करून व्यवस्थित विल्हेवाट लावण्याचे काम चालायचे. तो कधीकधी रात्र- रात्रभर लाकडं तोडत राहायचा. आरा मशीनवरून चोरलेले मोठमोठे लाकडाचे ओंडके. तो त्यांचे तुकडे करून सरपण म्हणून भरून ठेवायचा! रात्री एकेक वाजता तो टेम्पो बोलावून लाकडं आणि त्या वस्तू रफादफा करायचा. कुठे पाठवायचा माहीत नाही. पण त्याचा ठरलेला टेम्पोवाला होता. मागील पंधरा-वीस वर्षांपासून त्याचा हाच व्यवसाय होता. आजी त्याच्या आईला म्हणायची "लहानपणी याचे कान टोचले असते, तर हा असा निपजला नसता. पण आता उपयोग नव्हता. लहाणपणी वस्तू चोरून आला होता, तेव्हा तू मारलं नाही. आता रडून काय उपयोग ?असं आजी त्याच्या आईला समजावायची. पण चोरीच्या भरोशावर त्याने आपल्या बहिणीचं लग्न केलं. स्वतःचं लग्न केलं. घर चालवतो म्हटल्यावर त्याची आई पण त्याला काही बोलायची नाही. कोणत्याही लग्न समारंभात गेल्यानंतर अपटूडेट जायचा. कोणी संशयही घेऊ शकणार नाही. दाढी, कटिंग एकदम खटाखट! तो जेवणबी करायचा आणि हातबी मारायचा! पण त्याच्या पेहरावावरून कोणीही त्याच्यावर आरोप करू शकत नव्हते. हे सर्व कार्यक्रम तो शेजारच्या गावांमध्ये करायचा. आजी बरोबर ओळखायची की, आज याने कुठेतरी डाव मारला!

आता लोखंड्या थकला आहे. नातू-पणतू झाले आहेत त्याला. ईवाया -जावयाचा झाला तो. शरीरही आता त्याला साथ देत नाही. आता तसली कामंही त्याला शोभत नाही. अलिकडे दिवस-रात्र तो चंडिकेच्या मंदिरात पडलेला असतो. आयुष्यभर केलेल्या चुकांची माफी देवीच्या दारात मागत असतो. तिच्या पायऱ्यांवर आपला जीव जावा अशी त्याची इच्छा आहे.

■ **प्रा. भरत खैरकर**
बी-१/७, काकडे पार्क, ताणाजीनगर,
चिंचवड, पुणे-३३
मो. ९८८१६१५३२९.

## फुलराणी




# नाते विश्वासाचे!

**विश्वास ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. विश्वास जर नसेल, तर मोठ-मोठे अपराध घडून येतात. म्हणूनच विश्वास हवा. विश्वास फार मोठी गोष्ट असते. विश्वासाबाबत कितीतरी उदाहरणं देता येतील. विश्वास आहे म्हणूनच जग टिकून आहे.**



विश्वास ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. विश्वास जर नसेल तर मोठमोठे अपराध घडून येतात. म्हणूनच विश्वास हवा. विश्वासाचं एक उदाहरण...

कथा फेसबुकवरील आहे. उदाहरण पती आणि पत्नीचे आहे. एका घरी पत्नी कामावर गेली की एक स्त्री त्याच्या घरी येत असे. त्याचं कारण होतं त्याचं आजारीपण. तो आजार फक्त त्याच व्यक्तीला माहीत होता. शिवाय ती त्याला काही औषधी देऊन लवकरच निघून जात असे. तसं पाहिल्यास तिचं त्याचेसोबत 'तसं' काहीच नव्हतं.

तिला गंभीर आजार माहीत होता व ती त्याची फारच काळजी घेत असे, एक डॉक्टर म्हणून. ती डॉक्टर आणि तो पेशंट एवढंच त्यांचं नातं होतं. तसाच तोही तो आजार आपल्या पत्नीला सांगू शकत नव्हता. कारण त्याला भीती वाटत होती की, जर त्यानं तो आजार आपल्या पत्नीला सांगितला, तर ती त्याला चक्कं सोडून देईल. मात्र हे किती दिवस लपणार? त्याची पत्नी गेल्यावर रोजच ती त्याचे घरी येते, हे वस्तीतील आजुबाजूच्या लोकांना माहीत होतं. परंतु ती नेमकी त्याच्या घरी का येते, हे मात्र लोकांना माहीत नव्हतं. शेवटी त्याच लोकांनी तिला त्या गोष्टीची माहिती हवी म्हणून तिला सांगितलं आणि ते माहीत होताच तिनं त्यावर पाळत ठेवली. तिला आपण गेल्यानंतर कोणीतरी महिला आपल्या पश्चात या घरी येते, असा संशयच नाही, तर ती वास्तविकता वाटली. तिनं त्या प्रकरणाची शहानिशा न करता मनातल्या मनात संशय बांधला आणि ठरवलं, आपण अशा लबाड माणसाजवळ राहायचं नाही. मग तीच त्याला सोडून गेली. त्याला लागलीच घटस्फोटाची नोटीस पाठवली शिवाय खावटीही मागितली. ती केसही जिंकली. तिला खावटी मंजूर झाली. तसा आता त्याच्या जीवनातील शेवटचाच दिवस होता. तो काही जास्त जगणार नव्हता. त्याची पत्नी जशी केस जिंकली आणि त्याचेजवळ आली. तसा तिनं एक कागद त्याचेसमोर केला आणि म्हणाली, "तू व्यभिचारी निघाला नसतास, तर मी केसही टाकली नसती आणि खावटीही मागितली नसती."

तो चूप बसला. तशी तीच म्हणाली, "आता बोल ना. आता का बोबडी वळली. आता बोल ना, देणार की नाही खावटी?"

तिचे शब्द ऐकताच त्यानं एक फोन लावला. त्या एका फोनवर वकील व डॉक्टर हे सोबतच आले व वकिलाने एका कागदावर त्याची स्वाक्षरी घेतली. ज्यात लिहिलं होतं की, मी जास्त दिवसाचा पाहुणा नसल्यानं ही संपूर्ण मालमत्ता आजपासून तुझीच असून या संपूर्ण मालमत्तेचा यथायोग्य वापर कर. त्यानंतर त्यानं स्वतःचा स्वाक्षरी केलेला कागद तिच्याजवळ दिला व सोबत चाबीही. त्यानंतर तिनं कागद वाचला. त्या कागदावर लिहिलेला मजकूर वाचला आणि विचारलं की आपण खरोखरच आजारी आहात का? त्यावर तो म्हणाला,

"मी खरोखरच आजारी आहे आणि दोन-चार दिवसानं मरणारच आहे. मग ही मालमत्ता मी नावावर ठेवून काय करू? ही मालमत्ता तुझीच आहे. तू या मालमत्तेचा योग्य सांभाळ कर."

"मग ती कोण? जी दररोज आपल्या घरी येत होती."

"ती डॉक्टर आहे. ती रोज मलाच तपासायला येत होती."

"मग ती लपूनछपून का येत होती तुम्हाला तपासायला?"

"मीच म्हटलं होतं तिला की, ही गोष्ट तुला माहीत होऊ नये म्हणून."

"का? ती गोष्ट मला माहीत केली नाही?"

"मला वाटत होतं की तू मला सोडून जाशील, हा आजार माहीत झाल्यावर आणि शेवटी तू सोडून गेलीसच. आता हे सारं तुझंच आहे. मी फक्त दोन-चार दिवसाचाच सोबती आहे."


ही घटना हृदयाला स्पर्श करणारी आहे. अविश्वासाचे उदाहरण आहे. कधीकधी आपण जे डोळ्यानं पाहतोय ना, तेही वास्तविकपणे खरं नसतंच.

छत्रपती शिवाजी महाराजांवर संबंध मावळ्यांचा विश्वास होता व मावळ्यांचा शिवरायांवर. विश्वास नाही तर काय. अहो, शिवा काशिदनं अगदी विश्वास ठेवून शिवराय बनायचं ठरवलं व तो बलिदानास तयार झाला. शिवरायांचा मुस्लीम समाजावर विश्वास म्हणूनच आरमारांचा प्रमुख दौलतखानाला बनवलं व तोफखान्याचा प्रमुख इब्राहीम खानाला बनवलं.

विश्वास! विश्वास फार मोठी गोष्ट असते. विश्वासाबाबत कितीतरी उदाहरणं देता येतील. विश्वास आहे म्हणूनच जग टिकून आहे. नाहीतर देशातील लोकांची केव्हाचीच खांडोळी झाली असती. कारण जिथं विश्वास तुटतो, तिथं भांडणं व वाद उत्पन्न होत असतात. म्हणूनच सर्वांनी विश्वास करायला शिकावं. विश्वासघात करू नये. कारण विश्वासातून पवित्र नातं निर्माण होऊ शकतं. माणसं जोडता येऊ शकतात आणि विश्वासघातातून नाती तुटतात. माणसं दुरावली जातात आणि जे न व्हायचं ते होतं. जीवनाचा सत्यानाश होतो आणि तेवढाच संसाराचाही!


■ **अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

ज्ञानविज्ञान



# गॅलिलिओ यांचे प्रयोग

**प्रकाशाचा वेग किती आहे ? हे आज आपल्या सर्वांना माहीत आहे; परंतु प्रकाशाचा वेग किती आहे, याचा शोध लावण्याचा पहिला प्रयोग कोणी केला होता ? हे तुम्हाला ठाऊक आहे का? उत्तर असे आहे की, प्रकाशाचा वेग किती आहे, याचा पहिला प्रयोग गॅलिलिओ यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला होता.**



गॅलिलिओ गॅलिली हे खगोलशास्त्रज्ञ होते. गॅलिलिओ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १५६४ मध्ये इटली देशातील पिसा या शहरात झाला होता. गॅलिलिओ यांच्या आईचे नाव गिउलिया अमानती, तर त्यांच्या वडिलांचे नाव विन्सौन्जो होते. गॅलिलिओ यांचे वडील हे एक संगीतकार होते. १५७० मध्ये गॅलिलिओ यांचे संपूर्ण कुटुंब फ्लोरेन्स येथे आले. इथेच गॅलिलिओ यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले, तसेच त्यांचे पुढचे शिक्षण पिसा येथील विद्यालयात पूर्ण झाले. गॅलिलिओ यांना लहानपणापासूनच गणित विषयात आवड होती आणि त्यांना गणित क्षेत्रामध्येच आपली कारकीर्द घडवायची होती. गॅलिलिओ यांच्या वडिलांचा पहिल्यांदा या गोष्टीला नकार होता; परंतु गॅलिलिओ यांनी आपले गणित विषयातच कारकीर्द करण्याचा निर्णय घेतला होता.

गॅलिलिओ यांना गणित विषयाची आवड लहानपणापासूनच होती, तसेच त्यांना इतरांना शिकवण्याचे कौशल्यदेखील प्राप्त होते. त्यामुळे त्यांनी पुढे जाऊन १५८१ मध्ये एका कॉलेज मध्ये ॲरिस्टोटेलियन दर्शन हा विषय शिकवण्यास सुरवात केली.

गॅलिलिओ यांनी आपले ग्रॅज्युएशनपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले नाही आणि त्यांनी त्यांचे शिक्षण मध्येच सोडले. पुढे त्यांनी आपला संपूर्ण वेळ शिकवण्यामधे आणि संशोधन करण्यामध्ये घालवण्याचे ठरवले. १५८८ मध्ये त्यांनी फ्लोरेंस येथील एका विद्यालयात गणित विषयाच्या प्रोफेसरची नोकरी केली. पुढे जाऊन १५९२मध्ये पादुआ विश्वविद्यालयात खगोलशास्त्र विषयामध्ये प्रोफेसरची नोकरी केली आणि त्यांनी या विश्वविद्यालयात १६१० पर्यंत प्रोफेसरची नोकरी केली. इथेच त्यांनी आपला वेळ हा संशोधन करण्यामध्ये खर्च केला.

प्रकाशाचा वेग किती आहे ? हे आज आपल्या सर्वांना माहीत आहे; परंतु तुम्हाला हे माहीत आहे का की प्रकाशाचा वेग किती आहे, याचा शोध लावण्याचा पहिला प्रयोग कोणी केला होता ? तर उत्तर हे की, प्रकाशाचा वेग किती आहे, याचा पहिला प्रयोग गॅलिलिओ यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला होता.

या प्रयोगामध्ये ते आणि त्यांचे सहकारी रात्रीच्या अंधारामध्ये दोन वेगळ्या पर्वतावर कंदील घेऊन गेले होते. एका पर्वतावर कंदील घेऊन गॅलिलिओ उभे होते ,तर दुसऱ्या पर्वतावर गॅलिलिओ यांचे सहकारी कंदील घेऊन उभे होते. त्यांनी असे ठरवले होते की, जेव्हा गॅलिलिओ यांच्या कंदिलाचा प्रकाश त्यांच्या सहकाऱ्याला दिसेल, तेव्हा त्याने ती वेळ नमूद करून ठेवायची. त्यांचा हा प्रयोग करून झाला. गॅलिलिओ यांना त्या दोन्ही पर्वतामधील अंतर आधीपासूनच माहीत होते, त्यामुळे त्यांनी प्रकाशाचा वेग किती असेल याचा अंदाज या प्रयोगावरून आला.

त्यांनी हा वरील प्रयोग पुन्हा करायचे ठरवले आणि ह्यावेळी त्यांनी दोन पर्वतामधील अंतर हे पहिल्या प्रयोगावेळी घेतलेल्या दोन पर्वताच्या अंतरापेक्षा जास्त घेतले. त्यांनी पहिल्या प्रयोगाची प्रक्रिया पुन्हा दुसऱ्या प्रयोगावेळी केली. या दुसऱ्या प्रयोगावरून त्यांनी हा निष्कर्ष लावला की, या प्रयोगाद्वारे आपण योग्यरित्या प्रकाशाच्या गतीचा शोध लावू शकत नाही.

१६०८ मध्ये हॉलंडमध्ये दूरदर्शक दुर्बिणीचा शोध लागला होता. ह्या शोधाची माहिती जेव्हा गॅलिलिओ यांना कळली तेव्हा, त्यांनी स्वतःची आणि हॉलंडमध्ये प्रदर्शित केलेल्या दूरदर्शक दुर्बिणीपेक्षा शक्तिशाली दूरदर्शक दुर्बीण बनवण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी दिवसरात्र मेहनत घेतली आणि अखेर गॅलिलिओ यांनी २५ ऑगस्ट १६०९ मध्ये आपली स्वतःची दूरदर्शक दुर्बीण प्रदर्शित केली. गॅलिलिओ यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये २०० पेक्षा जास्त दूरदर्शक दुर्बिणीचा शोध लावला होता आणि त्या सर्व दूरदर्शक दुर्बीण त्यांनी शैक्षणिक संस्थांना भेट म्हणून दिल्या होत्या.

गॅलिलिओ हे एक थोर खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये विविध शोध लावले. गुरू ग्रहावर असणाऱ्या चार उपग्रहांचा शोधदेखील गॅलिलिओ यांनी लावला होता. अशा या थोर गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओ यांचे निधन वयाच्या ७७ व्या वर्षी ८ जानेवारी १६४२मध्ये झाले.

## लेखकांसाठी सूचना

लोकशाही वार्ताने 'प्रतिबिंब' पुरवणीत 'लोकसमीक्षा' या स्तंभांतर्गत पुस्तक समीक्षा/पुस्तक समीक्षणाचा स्तंभ सुरू केला आहे. लेखकांनी त्यांच्या पुस्तकाचे समीक्षण lokshahivartapratibimb@gmail.com या इमेलवर शक्य असल्यास युनिकोडमध्ये किंवा पुढील पत्त्यावर पाठवावे. योग्य समीक्षणास प्रसिध्दी देण्यात येईल. पुस्तक किमान दोन महिन्यात प्रसिध्द झालेले असावे. लिफाफ्यावर 'लोकसमीक्षा' स्तंभासाठी असा उल्लेख करावा. समीक्षणासाठी पुस्तक अनिवार्य राहील.

'प्रतिबिंब'मध्ये लिहिणाऱ्या सर्व लेखकांचे स्वागत आहे. रविवार पुरवणीचे नवे-बदललेले स्वरुप आपल्याला आवडले असेल, असा विश्वास वाटतो. आपले लेख, ललित, लघुकथा, हास्यकथा तसेच पर्यटन, दिन विशेष या सदराअंतर्गत साहित्य जास्तीत जास्त ६०० शब्दांपर्यंत पाठवायचे आहे. अंकाबाबत आपला अभिप्राय, प्रतिसाद आम्हाला आवर्जून कळवा. आमचा पत्ता: lokshahivartapratibimb@ gmail.com जे लेखक आपले लेख 'ई-मेल'द्वारे पाठवतात, त्यांनी ४ सी वा 'युनिकोड' फॉंटमध्ये पाठविल्यास ते अधिक सोईचे होईल. तेव्हा शक्यतोवर या फॉंट्समध्ये पाठविण्याचा प्रयत्न करावा, ही विनंती. अर्थात श्री लिपीमध्ये लेखन पाठविणाऱ्यांचेही स्वागतच आहे. जे लेखक टपालाने आपले साहित्य पाठवू इच्छितात, त्यांनी मूळ हस्तलिखिताची प्रत पुढील पत्त्यावर पाठवावी, ही विनंती.

:: आमचा पत्ता ::

संपादक, प्रतिबिंब, लोकशाही वार्ता,
थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह-२, १४८,
युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ,
नागपूर-४४००१०

बाल विहार



# विद्येची किंमत

एकदा रामकृष्ण परमहंस गंगास्नानासाठी शिष्यासह गंगेवर गेले. त्यावेळी एक सिद्ध पुरुषही तिथे होते. त्यांनी एक चादर पाण्यावर पसरली व त्यावर उभे राहून नदी पार केली. परत आले व रामकृष्णांच्या एका शिष्याला म्हणाले तुमचे गुरू, असा चमत्कार करू शकतील का ? बारा वर्षे तप करून मी ही सिद्धी मिळवली आहे. शिष्याने रामकृष्णांना हे सांगितले. ते म्हणाले, त्यांना सांग तुझा हा चमत्कार दोन आणे किमतीचा आहे. शिष्याने हा निरोप सिद्ध पुरुषाला सांगितला. तो भलताच भडकला. पुन्हा असे म्हणाला तर तुमचे भस्म करून टाकेन. रामकृष्ण यांनी पुन्हा तसेच म्हटलं. तेव्हा प्रत्यक्ष त्यांनाच सिद्ध पुरुषांनी त्याचा अर्थ विचारला. रामकृष्ण म्हणाले, नावाडीसुद्धा दोन आण्यात पैलतिराला नेतो. त्याचा इतरांना उपयोग होतो, पण तुमची विद्या फक्त तुमच्यापुरतीच आहे. ज्या विद्येचा लोकांना उपयोग होत नाही, तिची किंमत शून्य आहे.

**तात्पर्य:** माणसाने आपल्या विद्येचा समाजाला उपयोग करून द्यावा

## दु:खी मोर



एके काळी एक सुंदर मोर पावसाच्या दिवशी नाचत होता. तो स्वतःच्या सुंदर पिसाऱ्याची प्रशंसा करण्यात मग्न होता. त्याच्या उग्र आवाजाने त्याला स्वतःच्या कमतरतांची जाणीव करून दिली. त्याला झालेला सर्व आनंद हा दुःखामुळे नाहीसा झाला. अचानक, त्याला जवळच एक कोकीळ पक्षी गाताना ऐकू आला.

कोकीळ पक्ष्याचा गोड आवाज ऐकून त्याला स्वतःच्या कमतरतेची पुन्हा एकदा जाणीव झाली. असा आवाज देवाने का दिला आहे, असा तो विचार करू लागला. त्याच क्षणी, इंद्रदेव प्रसन्न झाला आणि त्याने मोराला विचारले, तू नाराज का आहेस? मोराने त्याच्या उग्र आवाजाबद्दल तक्रार केली आणि त्यामुळे तो कसा दुःखी झाला आहे ते सांगितले. म्हणाला, कोकिळेला इतका आवाज इतका सुंदर दिला आहे. मला का नाही?

मोराचे म्हणणे ऐकून इंद्रदेवाने सांगितले की, प्रत्येक जीव हा खास असतो. प्रत्येक जीव तयार करण्यामागे एक उद्दिष्ट असते आणि त्याप्रमाणे त्याला तयार केले गेलेले आहे. कोकिळेला देवाने सुंदर आवाज दिलेला आहे, परंतु तुलादेखील किती सुंदर पिसारा दिलेला आहे !

**तात्पर्य :** स्वतःला स्वीकारणे ही आनंदाची पहिली पायरी आहे. तुमच्याकडे जे नाही त्याबद्दल दुःखी होण्यापेक्षा, तुमच्याकडे जे आहे ते सर्वोत्तम करा.

## एकमेका साहाय्य करू

एक राजा प्रजेचे पुत्रवत पालन करीत असे. पण प्रजा आळशी असल्यामुळे तो चिंतित होता. दरबारातल्या वयोवृद्धांना त्याने विचारले काय करावे म्हणजे प्रजा कार्यप्रवण होईल? तेव्हा एका वृद्धाने सांगितले त्याप्रमाणे त्याने केले.

गजबजलेल्या रस्त्यात एक मोठा दगड ठेवला . जाणारे-येणारे दगडाच्या बाजूने जाऊ लागले व दगड मांडणाऱ्याची निंदा करू लागले. पण दगड हलवण्याचे कोणाच्याही मनात आले नाही. काही दिवसांनी एक माणूस त्या मार्गाने चालला होता. कोणालाही नावे न ठेवता त्याने खूप खटपटीने दगड हलवला. सर्वांची अडचण दूर झाली. राजाने दरबारात त्याचा सत्कार केला. खूप लोक जमले होते. राजा म्हणाला, याचे उदाहरण बघा ! मी राजा खरा, पण लोकांच्या साहाय्याखेरीज, कष्टाखेरीज मी एकटा राज्य वैभवशाली करू शकणार नाही.

**तात्पर्य:** एकमेकांना मदत केली, तर कामे सोपी होतात.



# काव्यफुले



## मुखवटे

ज्याचे त्याचे बघा जगी सारे ढोंग
करीतसे सोंग मुखवटे

पाहे स्वार्थ सदा तोंडी एक वसे
मनी भेद असे दुतोंडीच्या

उद्धट बोलणे अहंकार गाजे
त्याचा डंका वाजे दुनियेत

सकळ मंडळी होऊन भावुक
फसती घाऊक धोकेबाजा

विश्वची हे असे मतलबी सारे
पर्यायांचे वारे वाहतसे

स्वार्थीजन सारे करतील धोका
देऊ नका मोका पुन्हा-पुन्हा

तयांची ही वृत्ती मनी असे खोट
भरीतसे पोट ढोंगीजण

माय-लेकी आता सुरक्षित नाही
घडे काही बाई जगती या

विश्वासाची धुरा देऊ नका कुणा
रोग त्यांचा जुना घातपात

■ विजय वाटोरे
हिमायतनगर नांदेड
मो . ९९७५५९३३५९





## शब्द

अत्यंत कठोर । जखम देणारे ।
मनी सलणारे । शब्द नको ।।

आठवेल जन । शब्द ऐसे हवे ।
कधी कोणासवे । भांडू नका ।।

शब्द पाळणारा । शुद्ध बोलणारा ।
सत्य शोधणारा । श्रेष्ठ जगी ।।

वाद होण्याआधी । जिभेला आवरा ।
स्वत:स सावरा । योग्य वेळी ।।

शब्दाने नात्यास । जोडताही येते ।
तोडताही येते । शब्दानेच ।।

विचारपूर्वक । म्हणून बोलावे ।
अशुध्द टाळावे । शब्द सदा ।।

सत्कर्म कराल । वाद टाळसाल ।
तर जगसाल । आनंदाने ।।

शुद्ध तुझी वाणी । अजू नित्य ठेव ।
सत्कर्मांने देव । पावणार ।।

■ अजय चव्हाण
तरनोळी , ता. दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ८८०५८३६२०७

## गुंतले आहे

गुंतले आहे अशा शब्दांनी
शब्द कधी हसवतात,
शब्दांचा मार करुनी मनी
शब्द कधी रडवतात
शब्दांनीच नाते जुळतात
शब्दांनी करतात मनावर वार
शब्दांनेच नाते तोडली जातात
कारण शब्दालाही असतो धार
शब्द देतात जगण्याची आशा
दु:खातही देतात आधार
शब्दाच्या वेदना दुसऱ्यांना देतांना
विचार करावा स्वत: घेतांना
शब्दांनी मिळते आस प्रेमाची
शब्दाचा स्पर्श मनाच्या अंतरी
शब्दातच असे गुंफतात की
देहाचे भान हरवून जातात
शब्द हे बोलून जातात
कुणाचा विचार न करता
माणसे तर बदलतात मात्र
शब्द आयुष्यभर बोचत असतात
शब्दालाही भावना असतात
शब्दांत जीवनाचं सार असते
भरपूर बोलायचे असते
शेवटी शब्द अपुरे पडतात

■ प्रीती खोब्रागडे
मु. गुरढा, ता. लाखनी
मो. ७२१९५१५४४८



## हताश सूर्य

पंचमहाभुतांवर केली कुरघोडी,
प्रचंड तापला रवि, करपू लागली पृथ्वी !

मनमानी माणसाची,
झाली निसर्गासोबत बळजोरी !

अति झाले वायूप्रदूषण,
वसुंधरेचे बिघडले संतुलन !

गर्भात सूर्याच्या
माजला कोलाहल,
विकिरणांचे वाढले प्रखरपण !

वितळू लागले हिमनग,
नद्यांचे स्वत:वरचे सुटले नियंत्रण !

जिकडे तिकडे पाणीच पाणी,
समुद्राने सोडली आपली पातळी !

पसरू लागली रोगराई,
विषाणूंना वंशवृद्धीची घाई !

नेहमीचेच झाले पूर व त्सुनामी,
मेलेल्याबद्दल आता काहीच वाटत नाही !

वाढू लागला कृत्रिम उपग्रहांचा कचरा,
अंतराळसुध्दा कमी पडले मूर्ख मानवाला
अदृश्य व्हायला लागले आता ग्रहतारे,
आ वासून आहेतच कृष्णविवरे !

अनिर्बंध तृष्णा अतिसुखाची,
भारी पडली मनुष्याला त्याचीच कुमती !

पृथ्वीकडे बघून भास्कर हताश हसला,
सृष्टीनिर्माता स्वत:च खजिल झाला !

■ शिरीष मुंजे
नागपूर
मो. ९८२२९५६५६३

## प्रायश्चित्त

घालू नको रे फुंकर, जळू दे आज मला तू
आहे काय ही प्रीती, कळू दे आज मला तू
समजू न शकले तुला मी,
माझ्या मना कधी रे

डोळा भरुनी हृदयात, भरू दे आज मला तू
रडविले तुला सदा मी, अश्रू कधी न बघता
समजून हेच अश्रू गळू दे आज मला तू
प्रेम तुझे समजले मी खेळ बाहुल्यांचा

अडवू नको मृत्यूशी, खेळू दे आज मला तू
अंगात लाही लाही,
अन वेदनाही आत माझ्या
प्रायश्चित हेच माझे, ढाळू दे आज मला तू

■ प्रशांत नागपुरे
मु.पो - पाटणसावंगी,
ता. सावनेर जि. नागपूर
मो. ९५६३१९८२१०



# करिअर दिशा



## महाराष्ट्रात पायलट प्रशिक्षण केंद्र




पायलट प्रशिक्षित करण्यासाठी एअर इंडिया स्वतःचे फ्लाइंग स्कूल सुरू करणार आहे. अमरावती येथे दर वर्षी अशा १८० वैमानिकांना प्रशिक्षण देण्यात येईल. टाटा समूहाची एअर इंडिया भारतात पहिले फ्लाइंग स्कूल उघडणार आहे. अहवालानुसार, वैमानिकांची अपेक्षित कमतरता दूर करण्यासाठी एअरलाइन हे फ्लाइंग स्कूल सुरू करत आहे. या फ्लाइंग अकादमीमध्ये दर वर्षी १८० वैमानिकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असेल. इच्छुक वैमानिकांना एअर इंडिया अकादमीमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. उड्डाणाचा कोणताही अनुभव नसलेल्या इच्छुक वैमानिकांना एअर इंडिया अकादमीमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाचे सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतर या वैमानिकांना एअर इंडियाच्या कॉकपिटमध्ये थेट प्रवेश मिळेल. एअरलाइनने आपल्या प्रशिक्षण ताफ्यासाठी अमेरिकन कंपनी पाइपर आणि युरोपियन कंपनी डायमंड यांच्याकडून सुमारे ३० सगल-इंजिन आणि चार मल्टी-इंजिन विमानांची निवड केली आहे.

सरकार देशात व्यावसायिक पायलट प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे. कारण सध्या ४० टक्कयांपेक्षा जास्त विद्यार्थी प्रशिक्षणासाठी परदेशात जातात. त्यावर सरासरी दीड ते दोन कोटी रुपये खर्च होतो. एअर इंडियाला पुढच्या पिढीतील वैमानिकांवर लक्ष ठेवायचे आहे. हे प्रशिक्षण केंद्र राष्ट्रीय करिअरच्या दीर्घकालीन पाइपलाइनचा एक आवश्यक भाग असेल. भारतातील फ्लाइंग स्कूलमधील प्रशिक्षणाच्या गुणवत्तेत बरीच तफावत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परदेशात जावे लागते.

इंडिगो आणि स्पाइसजेटने ब्रँडेड प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी भारत आणि परदेशातील स्वतंत्र फ्लाइंग स्कूल्ससोबत भागीदारी केली आहे. इंडिगोने सात फ्लाइंग स्कूल्ससोबत सहकार्य केले आहे. ■

## ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’मध्ये करिअर

आजकाल सॉफ्टवेअर्स, विविध ॲप्लिकेशन्स तसंच उपकरणांमध्ये होत असलेला आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर पाहता या क्षेत्रामध्ये भविष्यात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ऑटोमेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स एक्स्पर्ट्सना असलेली मागणी वेगाने वाढत आहे. ए.आय.मध्ये करिअर करायचं असेल, तर विज्ञान शाखेतून बारावीची परीक्षा देणे आणि त्यानंतर काम्प्युटर सायन्स किंवा इंजिनिअरिंग ग्रॅज्युएट असणे गरजेचे आहे. त्यानंतर आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित विविध क्षेत्रांत स्पेशलायझेशन करून त्यात एक्स्पर्ट होता येतं. आयआयटी कॉलेजेसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राशी निगडित कोर्सेस करता येतात. खरगपूर, दिल्ली, मुंबई, कानपूर, मद्रास, गुवाहाटी, रूरकी या



शहरांतल्या आयआयटी कॉलेजेसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित कोर्सेस आहेत. त्याशिवाय बेंगळुरूतली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नवी दिल्लीतील नेताजी सुभाष इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिट्स-पिलानी, बेंगळुरूतलं सेंटर फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड रोबोटिक्स, अलाहाबादमधली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, तसंच हैदराबाद विद्यापीठ या संस्थांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित कोर्सेस उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील पदवीधराला मासिक ५०-६० हजारांपासून एक लाखापर्यंत वेतन मिळू शकतं. ■

अर्थचित्र

# वाणिज्य मंत्रालय ठरवणार कांद्याचे दर

कांद्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. कांद्यासंदर्भात नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकार गोठवण्यात आले असून, कांद्याचे दर आता थेट वाणिज्य मंत्रालय ठरवणार आहे.

नाफेड आणि एनसीसीएफ कांद्याला बाजार समितीपेक्षा कमी दर देत असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. याच कांदा प्रश्नामुळे लोकसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसला. केंद्र सरकारकडून नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून कांदा खरेदी होते. याआधी कांद्याचे दर नाफेड आणि एनसीसीएफकडून ठरवले जात होते. नाफेड बाजार समितीत कांदा खरेदी करणार नाही, तोपर्यंत व्यापारी आणि नाफेडमध्ये स्पर्धा होणार नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांना भाव मिळणार नाही, अशी ओरड शेतकरीवर्गातून होत आहे.

देशात दर वर्षी कांद्याच्या दराचा मुद्दा गाजतो. दरात सातत्याने चढ उतार होत असल्यामुळे शेतकऱ्यांना फटका बसत आहे. कधी अस्मानी संकट असते तर कधी सुलतानी संकट येते. अस्मानी संकटातून शेतकऱ्यांनी कांदा वाचवला, तरी सुलतानी संकट त्याला गाठते. दरम्यान, सरकारच्या धोरणाचादेखील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. कांद्याच्या दरात वाढ झाली की, सरकार निर्यातबंदी करते. परिणामी, कांद्याचे दर घसरतात. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो. यंदाही अशीच स्थिती राहिल्याचे चित्र होते. या वर्षी केंद्र सरकारने पाच लाख टन कांदा खरेदी करण्याचे जाहीर केले होते.



### गव्हाच्या किंमतीतील उसळीने सरकार सतर्क

गहू आणि मैद्याच्या वाढलेल्या दरांवर केंद्र सरकार कारवाई करू पाहत आहे. बाजारातील गव्हाच्या किमतीवर सरकार बारीक लक्ष ठेवून आहे. तसेच गव्हाची साठेबाजी रोखण्यासाठी आणि भाव स्थिर ठेवण्यासाठी सरकार सातत्याने बाजारात हस्तक्षेप करीत आहे.

मंत्रालयाने म्हटले आहे की, बफर स्टॉकच्या निश्चित मर्यादेत कोणतीही कपात केलेली नाही. सरकारने गहू आयातीवरील शुल्करचनेत बदल होण्याची शक्यता नाकारली. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग बाजारातील गव्हाच्या किमतींवर लक्ष ठेवून आहे. याशिवाय किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी विभागाने आवश्यक हस्तक्षेपही केला आहे. मंत्रालयाने स्पष्ट केले की, वाढ होणार नाही आणि दर स्थिर ठेवण्याचे काम केले जाईल. गव्हाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा सरकारचा दावा आहे. २०२४च्या रब्बी विपणन हंगामात विभागाने ११२ दशलक्ष गव्हाच्या उत्पादनाची माहिती दिली आहे. भारतीय अन्न महामंडळाने चालू रब्बी विपणन हंगामात ११ जून २०२४ पर्यंत २६६ लाख टन गहू खरेदी केला आहे.

सार्वजनिक वितरण प्रणाली आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत १८४ लाख टन गव्हाची गरज पूर्ण केल्यानंतर पुरेसा साठा उपलब्ध होईल. त्यामुळे गरज भासल्यास बाजारभाव नियंत्रित ठेवण्यासाठी हस्तक्षेप करता येईल. मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षी प्रत्येक तिमाहीमध्ये बफर स्टॉकमधील बदल दिसून येतात. १ जानेवारी २०२४ रोजी १३८ लाख टन बफर स्टॉकच्या निश्चित मर्यादेऐवजी १६३ लाख टन गहू उपलब्ध होता. बफर स्टॉकमध्ये घट झाल्याच्या वृत्ताचे खंडन करताना मंत्रालयाने म्हटले आहे की, बफर स्टॉकच्या निर्धारित नियमांनुसार कोणत्याही तिमाहीत गव्हाच्या साठ्यात कोणतीही घट झालेली नाही. गहू आयातीवरील शुल्क रचना बदलण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचे सरकारने स्पष्ट केले.

गव्हाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. सरकारी आकडेवारीनुसार, किरकोळ बाजारात गव्हाची किंमत १३ जून २०२४ रोजी ३०.८५ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचली आहे. ती एका वर्षापूर्वी २९.१ रुपये प्रति किलो होती. म्हणजेच एका वर्षात गहू ६.०१ टक्क्यांनी महागला आहे. पिठाच्या किमतीबद्दल बोलायचे झाले, तर १३ जून रोजी पीठ ३५.९८ रुपये प्रति किलो दराने उपलब्ध होते. एक वर्षापूर्वी ३४.३८ रुपये किलो होते. एका वर्षात पीठ ४.६५ टक्क्यांनी महागले आहे.

## निर्गुंतवणुकीबाबत पावले

मोदी सरकार पहिल्या शंभर दिवसांमध्ये आपल्या अजेंडयाअंतर्गत काही मोठी पावले उचलणार आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सरकार आयडीबीआय बँक आणि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एससीआय) मधील आपला वाटा कमी करणार आहे.

सरकारच्या यादीत प्रामुख्याने आयडीबीआय बँक, शिपिंग कॉर्पोरेशन आहेत. वर्ष निवडणुकीचे होते. त्यामुळे सरकारने हा निर्णय थंड्या बस्त्यात टाकला होता; परंतु आता सरकार हा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. सध्या शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये सरकारचा ६३.७५ टक्के वाटा आहे, तसेच आयडीबीआय बँकेची निर्गुंतवणूक प्रक्रिया दीर्घकाळापासून थांबली आहे. या बँकेत सरकारचा ४९.२९ टक्के, तर एलआयसीचा ४५.४८ टक्के वाटा आहे. सरकार आयडीबीआय बँकेतील आपला पूर्ण वाटा विकण्याच्या विचारात आहे.

सरकारच्या यादीत एनएमडीसी, स्टील लिमिटेड, बीईएमएल आणि एचएलएल लाइफकेयर हे सर्वाजनिक उपक्रमसुद्धा आहेत. यापूर्वी २०२२मध्ये सरकारने एअर इंडिया आणि नीलांचल इस्पात निगम लिमिटेड (एनआयएनएल) मधील आपली हिस्सेदारी विकली होती. शेअर बाजारात शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची कामगिरी चांगली होत आहे. मागील महिन्याभरात या शेअरच्या किमतीत १९ टक्के, तर वर्षभरात १३४ टक्के वाढ झाली आहे.

## राशिभविष्य



(रविवार ३० जून ते शनिवार ६ जुलै २०२४)

### मेष : अंतर्मनाचे संकेत उपयोगी

तुमचा हट्टीपणा इतरांसाठी डोकेदुखी ठरू शकतो. उतावळेपणाने अपेक्षित गोष्टी बिघडू शकतात. दैनंदिन खर्च तारतम्याने करण्याची आवश्यकता आहे. कौटुंबिक प्रसंगात टोकाची भूमिका घेणे टाळा. अंतर्मनाचे संकेत उपयोगी पडतील. अमावस्या मोठे वैचारिक बदल घडविणारी राहील. सप्ताहाचा शेवट घरगुती आनंदाच्या प्रसंगांचा, तर साहित्यिकांना अपेक्षित निर्मितीचा आहे.

### वृषभ : आर्थिक अडचणींचा सामना

तुमच्या राशीतील हर्षल काही तऱ्हेवाईक निर्णय घेण्याला प्रवृत्त करेल. मोठी उद्दिष्टे साध्य करण्याच्या अट्टाहासाने विपरित कृती करू नका. जिव्हाळ्याची माणसे दुरावणार नाहीत, याची खबरदारी घ्या. तुमचा परोपकार योग्य व्यक्तीसाठी आहे, याची खात्री आवश्यक आहे. उत्तरार्धातील अमावस्या आर्थिक अडचणी निर्माण करणारी, तसेच कुटुंबात अस्वस्थता निर्माण करणारी आहे.

### मिथुन : जवळच्या व्यक्तीचा वियोग

नोकरीत केलेल्या कामाची योग्य पातळीवरून दखल घेतली जाईल. प्रत्येक कामे सुनियोजित पद्धतीने केल्यास प्रगतीचे मार्ग सुकर होतील. कौटुंबिक प्रसंगात भावनाप्रधानता जास्त राहील. स्वतःच्या उद्दिष्टांची पूर्तता झाली, तरी जवळची नाती आणि हितचिंतक यांच्यातील स्नेहसंबंधांची दरी रुंदावण्याची शक्यता आहे. आर्थिक नियोजन आणि नियंत्रण यांच्या साहाय्याने अनाठायी खर्च टाळता येतील. काहीजणांना एखाद्या जवळच्या व्यक्तीचा वियोग सहन करावा लागेल.

### कर्क : सुवार्ता लाभतील

वादविवाद आणि भांडणे टाळल्यास मनःशांती लाभेल. भव्य उपक्रमांची उद्दिष्टे उराशी बाळगून स्वतःच्या योजना बनवाल. गुरू भ्रमण अपेक्षित आर्थिक प्रगतीचे संकेत देणारे आणि इच्छित गोष्टींना यश प्रदान करणारे आहे. उद्दिष्टे साध्य करण्याच्या अट्टाहासाने विपरित कृती करू नका. संतती इच्छूकांना सुवार्ता लाभतील. व्यय स्थानातील अमावस्या अनावश्यक खर्च करवणारी आणि नसत्या चिंता मागे लावणारी राहील.

### सिंह : धनलाभ होतील

छोट्या प्रतिकूल घटना आणि जवळच्या माणसांशी होणारे वादविवाद नैराश्य आणतील. नोकरदारांना काही अनपेक्षित अडचणींना सामोरे जावे लागले, तरी वरिष्ठ पातळीवरून तुम्हाला पूर्ण पाठिंबा लाभेल. नशिबाचा पाठिंबा कमी असला, तरी तुमचे परिश्रम योग्य मार्गावरील प्रवास चालू ठेवतील. उत्तरार्धात लाभस्थानात होणारी अमावस्या धनलाभ करून देणारी आहे.

### कन्या : दूरच्या प्रवासाचे योग

काही जणांना डोकेदुखी, तर काही जणांना पोटदुखी सतावण्याची शक्यता आहे. गुरू भ्रमण सन्मार्गाला नेणारे, आध्यात्मिक प्रवृत्ती जोपासणारे आहे. काहीजणांना दूरच्या प्रवासाचे योग येतील. ऐहिक इच्छा आकांक्षादेखील पूर्णत्वाला जाण्याच्या दृष्टीने अपेक्षित घडामोडी घडतील. अमावस्या नोकरीत अधिकार आणि पदलाभ करून देणारी राहील. सप्ताहांती परिश्रमपूर्वक आपल्या कर्तव्याचे पालन कराल.

### तुला : साधकांना गुरूचा सहवास

आपल्या जोडीदाराच्या आरोग्याबाबतदेखील दक्ष राहण्याची गरज भासेल. जीवनशैलीत सुधारणा केल्यास तक्रारींचे निवारण करता येईल. काहीजणांना अनपेक्षितपणे आर्थिक नुकसान सोसावे लागण्याची शक्यता आहे. आध्यात्मिक साधकांना गुरूचा सहवास लाभेल. उत्तरार्धातील अमावस्या आरोग्य नाजूक ठेवेल. सप्ताहांती गांभीर्याने प्राप्त परिस्थितीचा विचार करा.

### वृश्चिक : ऐहिक सुखांचा आनंद

उद्दिष्टपूर्तीने आपल्या क्षेत्रात मान वाढेल. कौटुंबिक जीवनात अपेक्षित घडामोडी घडतील. भेटीगाठी, संमेलने आणि स्नेहभोजने दैनंदिनीला नवचैतन्य देतील. उत्तरार्धातील अमावस्या आरोग्य नाजूक ठेवेल. स्वास्थ्यवर्धनासाठी आप्तेष्टांशी संवाद वाढवा.किरकोळ आजार स्वास्थ्य बिघडवतील. मानसिक संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. सप्ताहाच्या शेवटी ऐहिक सुखांचा आनंद घेता येईल.

### धनु : आहारप्रदूषण टाळा

सदिच्छा आणि विवेकबुद्धी जागृत ठेवलीत, तर तुमच्या उपक्रमात अनेकांचे सहकार्य लाभेल. स्वतःच्या उद्दिष्टांची पूर्तता झाली, तरी जवळची नाती आणि हितचिंतक यांच्यातील स्नेहसंबंधांची दरी रुंदावण्याची शक्यता आहे. आहारप्रदूषण टाळा. राशीच्या सप्तम स्थानातील अमावस्या कौटुंबिक जीवन अस्वस्थ ठेवेल. सप्ताहांती पती-पत्नीतील मतभेद वाढणार नाहीत, याची खबरदारी घ्या.

### मकर : सन्मानकारक घटना

जुन्या वास्तू समस्या पुन्हा डोके वर काढतील. विचार मंथनात स्वतःचाच हेका चालवाल. भौतिक आकर्षणातून घेतलेले निर्णय चुकीचे ठरण्याची शक्यता आहे. बुधवार यशदायी असला, तरी किरकोळ अडचणी पाठ सोडणार नाहीत. रवी भ्रमण व्यावसायिक जीवनात मान वाढवणारे आणि प्रगतीकारक आहे. उत्तरार्धातील अमावस्या सन्मानकारक घटना घडवेल. सप्ताहाचा शेवट मनःस्ताप देणारा राहील.

### कुंभ : आप्तेष्टांशी संवाद वाढवा

संतुलित विचार योग्य मार्गावरील प्रवास चालू ठेवतील. स्वतःचे म्हणणे इतरांना पटविण्याचा व्यर्थ प्रयत्न करू नका. बौद्धिक क्षेत्रातील तुमचा प्रभाव टिकून राहील. गुरू भ्रमण कौटुंबिक आघाडीवर अपेक्षाभंग करणारे राहील. स्वास्थ्यवर्धनासाठी आप्तेष्टांशी संवाद वाढवा. काही प्रसंगात भावनिक कुचंबणा होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धातील अमावस्या नैराश्याचा प्रभाव करणारी राहील. सप्ताहांती पुन्हा एकदा उत्साहाचे वातावरण राहील.

### मीन : अडचणी डोके वर काढतील

पुरोगामी विचारांचा पाठपुरावा केला, तरी अंतर्मनाच्या संकेतांकडे दुर्लक्ष करू नका. सात्विक विचार कृतीतील शुद्धता जपतील. आहारप्रदूषण टाळा. कुटुंबसुख, मनःशांती आणि समाधानप्राप्तीत तडजोडी कराव्या लागतील. उत्तरार्धातील अमावस्या कौटुंबिक शांती भंग करणारी आहे. काहीजणांना दूरच्या प्रवासाचे योग येतील. नव-नव्या अडचणी डोके वर काढतील. सप्ताहाचा शेवट शेतीमालाच्या व्यवहारात उत्पन्न वाढविणारा राहील.

ज्योतिषभास्कर शिरीष कुलकर्णी
मो. नं. ८७८८२६६६९०

# प्रथा भूत विवाहाची!

## वेचक-वेधक

मलेशियामध्ये यांग जिंगशान आणि ली शुएइंग नावाच्या जोडप्याचा एका भीषण कार अपघातात मृत्यू झाला. ही घटना मे महिन्यात पेराकच्या वायव्य भागात घडली. दोघेही गेल्या तीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि लवकरच लग्न करण्याचा विचार करत होते. जिंगशान हा लीला प्रपोज करण्यासाठी तिच्या वाढदिवसाच्या दिवशी बँकॉकला जाण्याचा विचार करीत होता, परंतु तसे करण्याआधीच कार उलटली आणि ते दोघेही आता या जगात नाहीत.



साऊथ चायना मॉर्निंग पोस्टच्या वृत्तानुसार, या अपघातानंतर दोन्ही घरांच्या कुटुंबीयांनी मिळून एक अनोखा विधी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपापल्या मुलांची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी भूत विवाह आयोजित केला होता.

चीनमधली ही परंपरा आहे. या अंतर्गत दोन अविवाहित मृत आत्मे विवाहाच्या पवित्र बंधनात बांधले जातात. असे मानले जाते की, असे केल्याने मृत्यूनंतरही दोघेही पती-पत्नीच्या रूपात कायमचे एकरूप होतात आणि यामुळे त्यांच्या आत्म्याला शांती मिळते.

जिंगशान आणि ली यांच्या कुटुंबीयांनी एका अंत्यसंस्कार हॉलमध्ये हा अनोखा सोहळा आयोजित केला होता, जिथे दोघांनी लग्न केले. घरच्यांनी त्यांच्यासाठी लग्नाचा फोटोही बनवला. जिंगशान यांच्या कुटुंबाने त्यांच्या शोकसंदेशात ली यांना त्यांची सून म्हणून स्वीकारले.

चिनी लोककथा तज्ज्ञ हुआंग जिंगचुन यांनी सांगितले की, या प्रथेमुळे प्रियजन गमावलेल्या नातेवाईकांच्या भावनिक गरजा पूर्ण करण्यात मदत होते. चिनी संस्कृतीच्या प्रभावाखाली, भूतविवाहाची ही प्रथा उत्तर कोरिया आणि जपानसारख्या अनेक पूर्व आशियाई देशांमध्येही प्रचलित आहे. ■

## माय कॅमेरा




**म्यानमार! :** पॅगोडा हे बौद्ध धर्मीयांचे ध्यानकेंद्र व प्रार्थनास्थळ होय. जगभरात जिथे-जिथे बौद्ध धम्माचा प्रभाव आहे, त्या देशांमध्ये असे भव्य पॅगोडा पाहायला मिळतात. म्यानमारमधील पॅगोडा तर जगप्रसिद्ध आहेत. म्यानमारमधील यंगून येथील श्वेडेगॉन पॅगोडा हा जगातील सर्वात उंच पॅगोडा होय. चीन, जपान, म्यानमार, कोरिया, श्रीलंका या बौद्ध धर्मीयांचे वर्चस्व असलेल्या देशांमध्ये विविध आकारांतील पॅगोडा पाहायला मिळतात.

वेगवेगळ्या पिकनिक स्पॉटवर फोटो काढण्याची क्रेझ सध्या वाढते आहे. हे लक्षात घेऊन वाचकांनी काढलेल्या आकर्षक आणि कलात्मक छायाचित्रांना 'माय कॅमेरा' या सदराअंतर्गत प्रसिद्धी देण्यात येईल. छायाचित्राबाबत थोडक्यात माहितीही वाचकांनी पाठवावी. छायाचित्रे पाठविण्याचा पत्ताः
lokshahivartapratibimb@gmail.com

# रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांचे सौंदर्य

## पर्यटन



रायगड हा महाराष्ट्र राज्यातील जिल्हा आहे. कुलाबा जिल्ह्याचे नाव आधी रायगड म्हणून ओळखले जात होते. विविध प्रकारच्या किनाऱ्यांनी वेढलेला जिल्हा म्हणून रायगडची ओळख आहे. रायगड जिल्ह्यात अनेक सुंदर समुद्रकिनारे आहेत. त्यांची माहिती आपण येथे बघू या.



### हरिहरेश्वर बीच

हरिहरेश्वर हे निसर्गरम्य समुद्रकिनारा आणि शांत वातावरणासाठी ओळखले जाते. त्यात कालभैरव, शिवमंदिरही आहे. हा समुद्रकिनारा त्याच्या मऊ वाळूने, आकर्षक पाणी आणि मंद वाऱ्याने समुद्रकिनारा प्रेमींना आकर्षित करतो.

जर तुम्हाला आराम करायचा असेल वा पोहायला जायचे असेल, तर हा बीच हे उत्तम ठिकाण आहे. तुम्ही हरिहरेश्वर मंदिर प्रदक्षिणा मार्गाला भेट देऊ शकता. तुम्हाला १०५ पायऱ्या चढून खडकाच्या रचनेकडे जावे लागेल. कालभैरव मंदिराच्या मागून मार्ग सुरू होतो. संपूर्ण चालण्याच्या मार्गावर दिसणारे आश्चर्यकारक दगडी बांधकाम आणि खडकांवर आदळणाऱ्या लाटा या चालताना एक विलक्षण देखावा निर्माण करतात.

तुम्हाला समोरील किनाऱ्यावरील बाणकोट किल्ला आणि ऑलिव्ह रिडले टर्टल संवर्धन प्रकल्पासाठी प्रसिद्ध असलेला वेलास बीच पाहता येईल.

फेब्रुवारी ते मे या कालावधीत हरिहरेश्वर येथील स्थानिक ग्रामस्थांनी कासव संवर्धनाची स्थापना केली. गावकरी कासवांची अंडी गोळा करतात आणि समुद्रकिनाऱ्यावर एक नैसर्गिक इनक्यूबेटर तयार करतात. तुम्ही स्थानिक बोटीदेखील भाड्याने घेऊ शकता.

### श्रीवर्धन बीच

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात स्थित, श्रीवर्धन समुद्रकिनारा पांढऱ्या वाळूने चमकतो. श्रीवर्धन शहराच्या अगदी जवळ हा किनारा आहे. समुद्रकिनाऱ्यालगतच अनेक होम स्टे उपलब्ध आहेत. समुद्रकिनारा सुमारे तीन किलोमीटर लांब आहे आणि शहरात असताना भेट देण्यासाठी हे सर्वात वरचे ठिकाण आहे. त्यात आंब्याच्या बागांनी आणि नारळाच्या बागांनी वेढलेला पांढऱ्या वाळूचा किनारा आहे.

नौकाविहार, वॉटर सर्फिंग, पॅराग्लायडिंग आणि पोहणे यांसारख्या जलक्रीडा प्रकारांचा अनुभव घ्यायचा असल्यास हा समुद्रकिनारा योग्य ठिकाण आहे. समुद्रकिनारा पर्यटकांना मनमोहक सूर्यास्ताची दृश्ये आणि सीफूड प्रेमींसाठी भेट देण्यासाठी उत्तम ठिकाण आहे. समुद्रकिनाऱ्याजवळ विविध होमस्टे पर्यायदेखील आहेत.

### दिवेआगर बीच

दिवेआगर बीच महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात असून, ते मुंबईपासून १७० किलोमीटर अंतरावर आहे. हे समुद्रकिनाऱ्यावर जाणाऱ्यांना मंत्रमुग्ध करणारे नैसर्गिक सौंदर्याचा आनंद प्रदान करते. समुद्रकिनाऱ्यावर पांढऱ्या वाळूने वेढलेले हिरवेगार आणि निळसर पाणी आहे. अरबी समुद्राच्या भरती-ओहोटीमुळे समुद्रकिनारा हे समुद्र सर्फिंगसाठी उत्तम ठिकाण आहे.

समुद्रकिनारा एक्सप्लोर करण्याचे काही उत्तम मार्ग म्हणजे सूर्यास्ताच्या सुंदर दृश्यांचा आनंद घेताना समुद्राच्या बाजूने संध्याकाळी फेरफटका मारणे किंवा बग्गी राईडचा आनंद घेणे! तुम्हाला समुद्रकिनारी शांत सुट्टी हवी असल्यास, तुम्ही समुद्रकिनाऱ्याभोवती असलेल्या विविध प्रकारच्या बीच रिसॉर्ट्समध्ये राहू शकता.

### मुरुड बीच

मुरुड हा अनेक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होम स्टेने नटलेला समुद्रकिनारा आहे. पोहण्यासाठी योग्य आहे आणि मुलांसाठी पोहायला जाण्यासाठी खूप सुरक्षित आहे. पॅरा-सेलिंग आणि पॅराग्लायडिंग यांसारखे वॉटरस्पोर्ट्सचे प्रकारदेखील आहेत. रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा हा एक अभेद्य किल्ला आहे. याचे खरे नाव जजीरे मेहरुब असे असून, जंजीरा म्हणजे पाण्याने वेढलेले बेट व मेहरुब म्हणजे चंद्रकोर. चारी बाजूंनी अरबी समुद्राने घेरलेला आहे.

रायगड जिल्ह्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र आहे. या समुद्राला लागूनच मुरुड गाव आहे. मुरुडच्यापुढे दंडा आणि राजपुरी ही गावे समुद्रकिनारी आहेत. मुरुडपासून राजपुरी चार पाच किलोमीटर अंतरावर आहे. या राजपुरी गावाच्या पश्चिमेला समुद्रात एका बेटावर मुरुड-जंजिरा आहे. ■